# दाता......



सोनेरी सडा,
शिंपडायचा तरी किती?
आणि केशराचा साठा,
सांडायचा तरी किती?
चंदेरी खजिना
लुटायचा तरी किती?
आणि या मनोहरी आकाशाला,
आपण नजरेत,
साठवायचे तरी किती?

पक्ष्यांनी,
किलबिलायचे तरी किती?
आणि झऱ्यांनी,
झुळझुळायचे तरी किती?
माडांनी ताल,
धरायचा तरी किती ?
आणि या अलौकिक संगीतांमुळे,

आपल्या कानांनी,
तृप्त, व्हायचे तरी किती?

फुलांनी,
फुलायचे तरी किती?
आणि रंगांनी,
उधळायचे तरी किती?
सुवासानी,
दरवळायचे तरी किती?
आणि या रंगीबेरंगी दुनियेने,
आपण, मंत्रमुग्ध
व्हायचे तरी किती?

निसर्गाने,
द्यायचे तरी किती?
आणि आपण ओंजळीत,
घ्यायचे तरी किती?

नतमस्तक,
व्हायचे तरी किती?
आणि  या निसर्गाचे पांग,
फेडायचे तरी कसे आणि किती ?

**........ चित्रा मेहेंदळे.**